# महिला दक्षता समिती व श्रीमती प्रमिला दंडवते

**साधना धारिया**

"तीस सालके बाद, काँग्रेसको महंगाईकी याद।" १९ सप्टेंबरला काँग्रेसपक्षातर्फे देशभर भाववाढ-विरोधी मोर्चे काढण्यात आले. कर्नाटकात तर प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनीच मुख्यमंत्र्यांविरुद्ध मोर्चा काढला! राजधानीतही श्री यशवंतराव चव्हाण (मध्येच निघून गेले म्हणा!) व श्री कृष्णचंद्र पंत या माजी केंद्रीय मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड (!) मोर्चा निघाला होता. जनता पक्षाकडे ट्रक्स व खाजगी बसेस्साठी पैसा नसल्याने महाराष्ट्रात ज्याप्रमाणे काँग्रेसने प्रतिमोर्चा काढला तसा येथे काढणे शक्य नाही. परंतु म्हणून जनता पक्ष गप्पच राहिला असे नाही. पक्षाच्या महिला दक्षता समितीने रातोरात पोस्टर्स काढून त्यांना उत्तर दिलेच. १९७४ साली असलेले भाव व सध्याचे भाव यांची आकडेवारी देऊन 'देखो और सोचो' असे आवाहन केले. महिला दक्षता समितीने "तीस सालके बाद, काँग्रेसको महंगाईकी याद!" ही घोषणा केली ती अगदी सार्थ होती, असे म्हणावे लागेल.

## स्नेहशील प्रमिलाताई

आज राजधानीत सरकार, व्यापारी वर्ग व ग्राहक यांच्यांत चर्चिली जाणारी 'दक्षता-समिती' ही काय चीज आहे, हे समजून घेण्यासाठीच या समितीच्या एक निर्मात्या व प्रमुख आधारस्तंभ प्रमिला दंडवते यांची भेट घेतली. सौ. प्रमिलाताईंच्या हसऱ्या चेहऱ्यामुळे व प्रेमळ बोलक्या स्वभावामुळे औपचारिकपणा कधीच राहत नाही. गप्पांच्या या ओघात या समितीच्या स्थापनेची पार्श्वभूमी, तिची उद्दिष्टे, कार्यक्षेत्र, विविध समस्यांवरील भूमिका व त्याला अनुसरून केलेली कृती इ. अनेक गोष्टींची सहज कल्पना आली.

## सुचेता कृपलानींच्या अध्यक्षतेखाली समिती

मुंबई व महाराष्ट्रभर, प्रामुख्याने शहरांत, प्रमुख महिला समितीतर्फे जे लाटणे-मोर्चे काढले गेले, त्यामुळे सरकारने किती धसका घेतला हे सर्वश्रुतच आहे. मात्र राज्यसरकार नेहमी केंद्रसरकारकडे बोट दाखवून स्वतः जबाबदारीमुक्त होण्याचा प्रयत्न करीत असे. साखरेचा अधिक पुरवठा करण्यापासून निर्यातीच्या धोरणापर्यंत केंद्रसरकार जबाबदार असे. त्यावेळी राजधानीत समितीतर्फे काम पाहाण्यासाठी कोणीच नव्हते. परंतु १९७४ मध्ये जेव्हा स्वतः प्रमिलाताई दिल्लीत आल्या तेव्हा ते काम सोपे झाले. प्रमिलाताई, व मृणाल गोरे, मंगला परिख यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली 'महागाईविरोधी महिला समिती' स्थापन केली.

## थोडा इतिहास

प्रमिलाताई म्हणाल्या, "त्या काळच्या केंद्रसरकारचे दिवाळखोर धोरण व आर्थिक हितसंबंधितांना पूरक दृष्टिकोण यांमुळे भ्रष्टाचाराबरोबरच महागाईही वाढत होती. समितीचे कार्य प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचेच होते. त्या वेळी दिल्लीत ठिकठिकाणी सभा, मोर्चे काढून, लाल किल्ल्यावर पंतप्रधानांविरुद्ध निदर्शने करून विरोध प्रकट केला होता. एक दिवस लाटणे-थाळी घेऊन पंतप्रधानांच्या घरासमोर धरणे धरले होते. त्याच सुमारास जयप्रकाशजींचे आंदोलन जोरात सुरू होते. त्यांनी ज्वलंत समस्यांच्या मुळाशीच हात घातल्याने आम्ही त्यांना पूर्ण सहकार्य देऊ केले. सरकार बदलल्याशिवाय भ्रष्टाचार थांबणार नाही व महागाई कमी होणार नाही; हे आम्हाला पूर्णपणे उमगले होते."

## नवा संदर्भ

सुचेता कृपलानींच्या निधनानंतर डॉ. सुशीला नायर या अध्यक्षपदी आल्या. यानंतर आणीबाणीत समिती विखुरली. काहींची धरपकड झाली. मार्चमध्ये जनता पक्ष सत्तारूढ झाला. आता समितीच्या कार्याचे स्वरूप निश्चित करण्यासाठी मृणालताई गोरे, अहिल्या रांगणेकर व प्रमिलाताई यांनी श्री मोहन धारियांची भेट घेतली. त्यांचे लक्ष महागाईकडे वेधून सिमेंट, साखर धोरण, तेल टंचाई वगैरे बाबतींत काही मागण्या करून आश्वासने घेतली. तसेच ठिकठिकाणी दक्षता समित्यांची स्थापना करावी, असे सुचवले. मात्र अजूनही सगळीकडे, दिल्ली ही या प्रकारच्या समित्या स्थापन झालेल्या नाहीत. ग्राहकांचे म्हणणे सरकारला कळावे या हेतूनेच ही मागणी केली होती. आवश्यक वस्तूंची निर्यात बंद व्हावी, साखरेचा पुरवठा अधिक व्हावा, सिमेंटसाठी आवश्यक तो वीज-पुरवठा केला जावा यासंबंधीही मागण्या केल्या होत्या. काँग्रेसने केलेला तेलाचा गैर-व्यवहार समजल्यानंतर एक महिन्यात ८·५० रु. दराने तेल उपलब्ध होईल, असे त्यांनी आश्वासन मिळवले.

## नामान्तर

महंगाई समितीची नव्या परिस्थितीत बैठक झाली. स्त्रिया व समाजाच्या प्रश्नांवर निःपक्षपणे कृती करणारी संघटना असावी, परंतु ती राजकीयदृष्ट्या जागृत असावी, अशी गरज भासली, तसेच जयप्रकाशजींची दक्षता-समित्यांची कल्पना पटल्यामुळेच 'महागाई-विरोधी समिती' हे नाव बदलून 'महिला दक्षता समिती' हे नाव दिले गेले. नावाप्रमाणेच या समितीत कोणाचे वैयक्तिक हितसंबंध नाहीत याची दक्षता घेतली जाते.

## समितीची उद्दिष्टे व रचना

महागाईचा प्रश्न, भ्रष्टाचार, सामाजिक अन्याय, हुंडापद्धती यांसारख्या प्रश्नांचा सक्रिय विचार करणे, तसेच महिलांची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न करणे ही नवी उद्दिष्टे स्वीकारली गेली. दिल्लीतील पूरग्रस्त भागांमध्ये समितीने काम केले आहे. जनतेला या

**समितीची** ओळख व्हावी म्हणून सभा **आयोजित** केल्या होत्या. पहिल्याच सभेत ३००–३५० महिलांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा **देऊन समितीच्या** कार्याचे यश निश्चित केले. **समितीच्या सोयीसाठी** महागाईविरोधी **समिती, हुंडाविरोधी** समिती, कायदा समिती, **स्त्रियांची प्रतिष्ठा** समिती, माहिती व प्रसिद्धी **समिती,** निवडलेल्या प्रतिनिधींची समिती अशा ३५ समित्या तयार केल्या. प्रतिनिधींनी **समितींच्या** कार्याबद्दल जागरूक राहून कार**वाई करावी** ही अपेक्षा आहेच.

### महागाईविरोधी भूमिका व कृती

"स्त्रियांना कृतिशील करायचे तर त्यांच्या **जीवनाशी** निगडित समस्यांचा विचार प्रथम **करायला** हवा. याच दृष्टिकोनातून महागाईचा **विषय** प्रथम विचारात घेतला. तेल, डाळी **यांच्या** किंमती वाढलेल्या होत्या. मुंबईला **बाजारात** आयात केलेले तेल आले तरी, राज**धानीत** ते आलेले नव्हते, म्हणून दिल्ली प्रशा**सकीय अधिकाऱ्यांची** भेट घेतली. नंतर तेथे **तेल येऊनहीं** बाजारात आले नव्हते. म्हणून **समितीच्या** सदस्यांनी बाजारात पाहणी केली. **तेव्हा** त्यांना आढळून आले की, ते तेल हॉटेल**वाले,** भजीवाले यांना ८–५० दराने मिळत **होते,** मात्र सामान्य ग्राहकाला १४–१५ रु. **दराने** तेल विकत घ्यावे लागत होते! व्यापारी **वर्ग** 'तेल चांगले नाही' म्हणून लोकांची **मने** दूषित करीत होता. समितीने ताबडतोब **हा** प्रकार दिल्ली प्रशासनाच्या निदर्शनास **आणून** दिला.

### लोकमताचे दडपण

**घाऊक** व्यापारी व गिरणीवाले हे संगनमताने **तेल भेसळ** करण्यासाठी व्यापाऱ्याकडे पाट**वीत** व सरसोंच्या तेलात ते मिळवून कोटय**वधी** रुपयांचा फायदा जनतेला लुबाडून **मिळवीत.** महिला दक्षता समितीने दिल्लीत **ठिकठिकाणी** ३५ सभा घेऊन लोकांना हे **पटवून** दिले व तेलाच्या दर्जाचीही हमी दिली. **दिल्ली प्रशासनानेही** कबूली देऊन दोन तेल **गिरण्यांचे** परवाने रद्द केले. ३ ऑगस्ट रोजी **ग्राहकांची** परिषद झाली. श्री चंद्रशेखर, **घाऊक** व्यापारी, किरकोळ व्यापारी, किरकोळ **व्यापारी,** ग्राहक यांना समितीने एकत्र आणले. **या सभेला खूपच** चांगला प्रतिसाद मिळाला. सभेच्या ठिकाणी, भर पावसात, अनेक लोक हॉलची गॅलरी व रस्त्यावर जमले होते. आर्य समाज हॉलचे चालक म्हणाले "इतकी मोठी सभा या हॉलमध्ये कधीच झाली नाही!' समितीच्या कार्याला ही पावती पुरेशी होती.

### भ्रष्टाचाराचा नमुना

घाऊक व्यापाऱ्यांनीही नागरी पुरवठा खात्यात होणाऱ्या भ्रष्टाचाराविषयी प्रश्न काढला होताच. प्रमिलाताईंनी एक अनुभवही सांगितला, "पंजाब नागरी पुरवठा खात्याचा ट्रक दिल्लीतील घाऊक व्यापाऱ्याकडे गेला होता,– ते समजल्यावर पंजाबचे मंत्री श्री हरभजनसिंग यांना तसे फोनने कळवले. त्यांनी ताबडतोब विक्री थांबवली व मा. मंत्र्यांनी महिला दक्षता समितीला धन्यवाद दिले. जी माहिती स्वतःच्या खात्याकडून मिळू शकली नाही ती दिल्लीच्या महिलांनी दिल्यामुळे गैरसमज थांबवण्यास मदत झाल्याचे ते म्हणाले."

### सर्व मार्केटस्‌मध्ये समित्या

किरकोळ विक्रेत्यांना विश्वासात घेऊन, त्यांचीही भूमिका समजावून घेऊन सर्व मार्केटस्‌मध्ये 'तक्रार कचेरी' उघडण्याची योजना प्रमिलाताईंनी सांगितली. यामुळे सरकारने निश्चित केलेल्या किंमती व प्रत्यक्षातील किंमतीतील तफावत दूर करता येईल व साठेबाजी, काळाबाजार यांवर नियंत्रण आणता येईल असे त्यांना वाटते. समितीचा लोकमान्यता मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच संदर्भात त्यांनी ११ सप्टेंबरला एक दिवसाचा 'परिसंवाद' घडवून आणला. त्यामध्ये प्रथमच सरकारी प्रतिनिधी, उत्पादक, वितरक व ग्राहक एकत्र आणले गेले. या परिसंवादात काही मागण्या करण्यात आल्या. उदा० व्यापारी वर्ग ज्या काळ्या पैशाचा वापर करतो तो थांबवला जावा म्हणून धार्मिक व सामाजिक विश्वस्त संस्थांनी हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम व्यापाऱ्यांना रोखीने न देता बँकेमार्फतच द्यावी. तसेच 'आवश्यक वस्तू कायद्याची' अंमलबजावणी सरकारने कठोरपणे करावी किंवा केंद्र सरकारने तसा वटहुकुम काढावा, व मुख्य म्हणजे किंमतीचे धोरण ठरवताना, वसुली व विक्रीची किंमत ठरवताना ग्राहकांच्या प्रतिनिधींनाहीं विश्वासात घ्यावे **म्हणजे** ग्राहकांना न्याय मिळवून देता येईल. **आवश्यक** वस्तूंची वसुली, पुरवठा व वाटप **करताना** ग्राहकांची सल्लागार समिती सर्वत्र **नेमावी** व ज्या वस्तूंचे उत्पादनच अपुरे आहे **अशा** वस्तू खाजगी व्यापाऱ्यांकडे विक्रीस न **देता** स्वस्त धान्य दुकानांतच परस्पर **पोचवल्या** जाव्या व खेड्यापाड्यापर्यंत तशी **व्यवस्था** केली जावी.

### ग्राहक चळवळीची योजना

प्रमिलाताईंनी सांगितले की समितीच्या **घटने** प्रमाणे हिंदुस्थानभर खेड्यापाड्यांतून **महिला** दक्षता समित्या स्थापन केल्या **जातील** प्रथम कार्यपद्धती निश्चित केली **जाईल** पुण्यामध्ये सुरू झालेल्या ग्राहक-**चळवळी** प्रमाणेच दिल्लीलाही ग्राहक मंडळे **सुरू** करण्याचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारकडून **संपूर्ण** सहकार्य मिळत आहे. मात्र दिल्ली **प्रशासना** कडून मात्र तेवढ्या प्रमाणात मिळत **नस**ल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी **जास्त** संपूर्ण असहकार हे तत्वही आचरणात **आ**ण्याचा विचार त्यांनी सांगितला. **वास्तवि**क काही राष्ट्रीय प्रश्नांसाठी जनता **पक्षाने** पुढाकार घेऊन चळवळ सुरू करायला **पाहि**जे परंतु तरीही मोठ्या अभिमानाने **प्रमिला**ताईंनी सांगितले की, "आम्हाला **सहका**र्य मिळाले तर हवेच आहे. स्वयंस्फूर्तपणे **को**णी असे काम सुरू केले तर नंतर सहयोग **सा**धणे सोपे जाईल. आम्ही महिलांनीच **स्वतः**च्या जबाबदारीवर ही समिती स्थापन **केली** व आमचे कार्य सुरू आहे."

महिला दक्षता समितीची इतर **प्रश्नांवर**ील भूमिका पुन्हा केव्हा तरी समजून **घेण्या**चे आश्वासन घेऊन मी मुलाखत थांबवली. मनात एक प्रश्न मात्र घोळत होता. महत्त्वाच्या राष्ट्रीय समस्यांवर शाब्दिक मकी उडवीत राहण्यापेक्षा सर्वपक्षीय एकत्र येऊन काही विधायक कृती का नाहीत? महागाई, हरिजनांवरील **अत्या**चार, शैक्षणिक क्षेत्रातील अशांतता, इत्यादी **सा**माजिक प्रश्नांचे राजकीय भांडवल केल्याने जनतेसाठी काय साध्य होणार आहे?